# इथेनॉलवरील निर्बंध तात्पुरते, लवकरच मिळणार दिलासा

## केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची माहिती



**पुणे :** केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर घातलेल्या निर्बंधांमुळे साखर कारखाने अडचणीत आले आहेत, याची जाणीव केंद्र सरकारला आहे. देशाच्या साखर उत्पादनात काहीशी तुट येण्याची शक्यता असल्यामुळे हे निर्बंध घालण्यात आले आहेत. पण, हे निर्बंध तात्पुरते आहेत. लवकरच निर्बंधांमधून दिलासा देण्यात येईल, असे स्पष्ट संकेत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिले.

वसंतदादा शुगर इंन्स्टिट्यूटने (व्हीएसआय) आयोजित केलेल्या जागतिक साखर उद्योगातील शाश्वतता, आव्हाने आणि संधी, या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये ते बोलत होते. गडकरी यांच्या हस्ते तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे उद्घघाटनही करण्यात आले.

नितीन गडकरी म्हणाले, केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर घातलेल्या निर्बंधांमुळे साखर कारखाने अडचणीत आले आहेत, याची जाणीव केंद्र सरकारला आहे. पण, हे निर्बंध तात्पुरते आहेत. इथेनॉल प्रश्नी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संपर्कात आहे. दीर्घकालीन इथेनॉल धोरणानुसार केंद्र सरकारकडून इथेनॉल उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची भूमिका कायम आहे. लवकरच इथेनॉल निर्बंधांबाबत दिलासा मिळेल.

आता साखर कारखान्यांनी फक्त इथेनॉल उत्पादनावर थांबू नये. कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी), हरीत हायड्रोजन आणि हरीत विमान इंधन उत्पादनाच्या दिशेने गेले पाहिजे. पानिपतमध्ये भाताच्या पेंढ्यापासून (भाताचे उर्वरीत कृषी अवशेष) कॉम्प्रेस्ड बायोगॅस आणि हरीत विमान इंधन उत्पादन करण्यात यश आले आहे. आता साखर कारखान्यांनी कारखान्यांनी कचरा, सांडपाणी, मळीसह सर्व प्रकारचा कृषी कचरा आणि शहरी कचऱ्यापासून इथेनॉलसह सीबीजी, हरित हायड्रोजन आणि विमान इंधन निर्मिती करण्याकडे वळावे. केंद्राच्या हरीत हायड्रोजन धोरणांअर्गत सहकार्याची भूमिका घेतली जाईल, असेही गडकरी म्हणाले.

**देशात इथेनॉलचे ३०० पंप होणार**

केंद्र सरकारने इथेनॉल उत्पादन धोरणानुसार देशात फक्त इथेनॉलचे ३०० पंप सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे आता देशभरातील साखर कारखान्यांनी पेट्रोल-डिझेल पंपाच्या बरोबरीने इथेनॉल पंप सुरू करता येतील. आसाममध्ये बांबूपासून इथेनॉल निर्मितीचा प्रयोग यशस्वी झाला असून, उत्पादित झालेले इथेनॉल बांगलादेशाला निर्यात केले जात आहे. लवकरच देशातील रस्त्यांवरून पूर्णपणे इथेनॉल आणि हरित हायड्रोजनवर चालणाऱ्या गाड्या धावतील, असेही गडकरी म्हणाले.

**विदर्भात साखर उद्योगामुळे बळ मिळेल**

साखर उद्योगामुळे पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला आहे. त्यात व्हीएसआय आणि शरद पवार यांचे मोठे योगदान आहे. नागपूरनजीक बुटीबोरी येथे व्हीएसआयने संशोधन केंद्र स्थापन केल्यामुळे आता विदर्भात उसाचे क्षेत्र वाढून साखर उद्योगाच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण होईल आहे, असेही नितीन गडकरी म्हणाले.

---

### राष्ट्रीय हिताला प्राधान्य देण्याचे राज्यपाल रमेश बैस यांचे माध्यमांना आवाहन

**मुंबई :** 'विकसित भारत संकल्प यात्रे'चा भाग म्हणून विविध राज्यांमधील माध्यम प्रतिनिधींसाठी महाराष्ट्र दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ओडिशा आणि उत्तराखंड राज्यांमधील पत्रकारांच्या एका शिष्टमंडळाने गुरुवारी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली.

दोन्ही राज्यातील दूरचित्रवाणी आणि मुद्रित माध्यमातील पत्रकारांशी संवाद साधताना पत्रकारिता करताना माध्यमांनी राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन राज्यपाल बैस यांनी यावेळी केले.

माध्यमांनी निव्वळ गुन्हेगारीविषयक बातम्यांवर प्रकाश टाकण्याऐवजी समाजातील सकारात्मक घडामोडी वाचकांपुढे आणून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

आपण अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री म्हणून काम केले होते, असे सांगून राज्यपाल बैस यांनी इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांच्या क्रांतीनंतर देखील मुद्रित माध्यमाने आपली विश्वासार्हता व जागा टिकवून ठेवल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

विकसित भारत संकल्प यात्रेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र भेटीचे आयोजन केल्याबद्दल माध्यम प्रतिनिधींनी भारत सरकारचे आभार मानले. राज्य भेटीमुळे आपणांस महाराष्ट्राचा विकास, प्रगती आणि सांस्कृतिक वारसा पाहता आला, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र भेटीत नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी पुणे, आयएनएस शिवाजी आणि जवाहरलाल नेहरू बंदर आदी संस्थान पाहून प्रभावित झाल्याचे त्यांनी सांगितले व राज्य भेटीचा उपक्रम सुरु राहावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

---

## नाशिककरांच्या प्रेमाची प्रधानमंत्री नरेंद्र मोदींवर बरसात

**नाशिक :** राष्ट्रीय युवा महोत्सवाचे औचित्य साधत नाशिक दौऱ्यावरील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे हजारो नाशिककरांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून उत्स्फूर्त स्वागत केले. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या नाशिक येथील आगमनाने उल्हसित झालेल्या नागरिकांनी स्वागताचे फलक हाती घेत 'भारत माता की जय'चा जयघोष करत आसमंत दुमदुमून टाकला. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या या 'रोड शो'ची जादू नाशिककरांवर झाल्याचं चित्र आज सगळीकडे पाहायला मिळाले.

सकाळी ठीक १०-३० वाजता प्रधानमंत्री श्री. मोदी यांचे निलगिरी बाग हेलिपॅड येथे आगमन झाले. त्यानंतर हॉटेल मिर्ची चौकातून केशरी रंगाच्या आणि फुलांनी सजवलेल्या खुल्या जीपमधून त्यांच्या 'रोड शो'ला प्रारंभ झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, चंद्रशेखर बावनकुळे हे देखील रोड शोमध्ये सहभागी झाले होते.

नाशिकच्या युवा वर्गाने केलेली गर्दी, महिला वर्गाचा प्रचंड प्रतिसाद, दुतर्फा सजलेले रस्ते अशा वातावरणात तपोवनाच्या दिशेने निघालेल्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना ठिकठिकाणी या आपुलकी आणि प्रेमाने केलेल्या स्वागताचा अनुभव आला. उपस्थितांच्या दिशेने हात उंचावत तसेच उपस्थितांना अभिवादन करत प्रधानमंत्री श्री. मोदी यांचा ताफा तपोवन कडे निघाला.

लेझिम पथक, ढोलपथक, पारंपरिक वाद्ये यांच्या साहाय्याने आणि नृत्य करत विविध पथके या मार्गावर प्रधानमंत्री श्री. मोदी यांचे स्वागत करत होती. हॉटेल मिर्ची ते तपोवन पर्यंतचा संपूर्ण रस्त्यावर उत्साह, चैतन्य, आनंदाचे वातावरण होते. हातात तिरंगा घेऊन युवकांनी प्रधानमंत्री श्री. मोदी यांचे स्वागत केले. त्याचबरोबर विविध ठिकाणच्या युवा मंडळांनी मल्लखांब प्रात्यक्षिके, पारंपरिक कलांचा आविष्कार यावेळी सादर केला. त्र्यंबकेश्वर येथून आलेल्या आणि बाल वारकऱ्यांच्या समावेश असलेल्या दिंडीने विशेष लक्ष वेधले. आदिवासी आणि पारंपरिक लोकनृत्य, पंजाबी नृत्य, अशा विविध पद्धतीने आणि विविध रंगी वेशभूषा करून नागरिकांनी प्रधानमंत्री श्री. मोदी यांचे स्वागत केले.

**रामकुंड येथे पंतप्रधान मोदींच्या हस्ते जलपूजन**

**रोड शो नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाशिकच्या रामकुंड परिसराला त्यांनी भेट दिली. पुरोहित संघाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. नाशिककरांच्या वतीने चांदीचा कुंभ आणि पगडी देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. भारत विकसित राष्ट्र बनण्यासाठी यावेळी संकल्प करण्यात आला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आरती देखील करण्यात आली.**

---

## इंदापुरात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांमध्ये राडा

### कोनशिलेवर सुप्रिया सुळेंचे नाव नसल्याचे शरद पवार गट आक्रमक

**इंदापूर :** इंदापूर येथे विविध विकासकामांचे उद्घाटन आज होणार होते. दरम्यान भुमिपूजनाच्या कोनशिलेवर खासदार सुप्रिया सुळे यांचे नाव नसल्याने शरद पवार गट चांगलाच आक्रमक झाला. अजित पवार आणि शरद पवार गटामध्ये उद्धाटनावरुन तुफान राडा झाला. दोन्ही गट आमने-सामने आल्याने मोठा वाद इंदापुरात पाहायला मिळाला.

**काय आहे संपूर्ण प्रकरण?**

इंदापुरात विविध विकासकामांचे भूमिपूजन होणार होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागातील काही अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या इमारतीचे उद्धाटन करण्यात येणार होते. दरम्यान, या इमारतीच्या कोनशिलेवर खासदार सुप्रिया सुळे यांचे नाव नसल्याने शरद पवार गट आक्रमक झाला.

शरद पवार गटाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात जात अधिकाऱ्यांना घेराव घातला. त्यानंतर आंदोलनही सुरु केले. याच वेळी अजित पवार गटाचे आमदार दत्तात्रय भरणे भूमिपूजनाच्या ठिकाणी दाखल झाले. यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाजवळ दोन्ही गट आमने-सामने आल्याने दोन्ही गटात तुफान राडा झाला.

**बांधकाम विभागाच्या कार्यालयाजवळ तणाव**

अजित पवार आणि शरद पवार गटामध्ये राडा झाल्यानंतर बांधकाम विभागाच्या कार्यालयाजवळ तणाव निर्माण झाल होता. दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा वाद सुरु झाल्याने परिसरात बराच काळ तणाव होता. यावेळी कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी देखील केली.

आमदार दत्तात्रय भरणे काय म्हणाले?

शरद पवार आणि अजित पवार गटामध्ये झालेल्या वादाबाबत इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांनी भाष्य केले आहे. खासदार सुप्रिया सुळे आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे नाव घाई गडबडीत कोनशिलेवर लिहायचे राहिले आहे. ते आगामी काळात दुरुस्त करण्यात येईल, असे आमदार भरणे यांनी स्पष्ट केले.

**घाटी रुग्णालयातील प्रकरणानंतर सुप्रिया सुळे आक्रमक**

छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाली होती. या हाणामारीमध्ये एका डॉक्टरांच्या डोक्याला देखील रॉड लागला होता. त्यामुळे संपूर्ण राज्यातून या प्रकरणावर संताप व्यक्त केला जात होता. दरम्यान आता खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील आज (दि.१२) घाटी रुग्णालयाला भेट देऊन जखमी डॉक्टर महिलेची विचारपूस केली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

**देवेंद्र फडणवीस ,हसन मुश्रीफ यांच्या भेटीसाठी वेळ मागणार**

सुप्रिया सुळे म्हणाल्या, घाटी रुग्णालयात घडलेली घटना चुकीची आहे. याबाबत सर्व माहिती घेतली. शहरात गुन्हेगारी वाढली आहे. मी उद्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री हसन मुश्रीम यांच्या भेटीची वेळ मागणार आहे. त्यांनी याबाबत उत्तर दिले पाहिजे. डॉक्टरांवर झालेला हल्ला निंदनीय आहे. गृहमंत्रालयाच्या निष्काळजीपणामुळे अशा घटना घडत असल्याचा आरोप सुप्रिया सुळे यांनी केला.

---

## लिंबूवर्गीय फळपिकांसाठीच्या तीन सिट्रस इस्टेटसाठी ७ कोटींचा निधी

**मुंबई :** जिल्हा मध्यवर्ती रोपवाटिका उमरखेड, अमरावती, सिट्रस इस्टेट, धिवरवाडी, नागपूर, सिट्रस इस्टेट तळेगाव, वर्धा येथील शासकीय तालुका फळरोपवाटिकांमध्ये लिंबूवर्गीय फळपिकांकरिता सिट्रस इस्टेट स्थापन करण्यात आली आहे. या सिट्रस इस्टेटसाठी ७ कोटी २४ लाख ६७ हजार रुपयांच्या निधीस मंजूरी देण्यात आली आहे.

सिट्रस इस्टेटसाठीच्या या निधीचे वितरण पुढील प्रमाणे होणार आहे. उच्चतंत्रज्ञान आधारीत रोपवाटीका स्थापन करण्यासाठी ३५ लाख ६५ हजार रुपये, त्यापैकी ६ लाख १५ हजार रुपये धिवरवाडी ता.काटोल, जि. नागपूरसाठी तर २९ लाख ५० हजार रुपये तळेगाव ता. आष्टी. जि. वर्धासाठी वितरित करण्यात येणार आहे. उमरखेड, ता. मोर्शी, जि. अमरावती येथील सिट्रस इस्टेटसाठी प्रशासकीय इमारत बांधकाम, कार्यालय, प्रयोगशाळा, प्रशिक्षण भवन, निविष्ठा विक्री केंद्र इत्यादीसाठी १ कोटी, तिन्ही सिट्रस इस्टेटमध्ये अवजारे बँक स्थापनेसाठी २ कोटी १४ लाख, माती, पाणी, उती व पाने चाचणी प्रयोगशाळा आणि जिवाणू खते उत्पादनासाठी लागणाऱ्या साहित्यासाठी ३ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या सिट्रस इस्टेटचे कृषी आयुक्तालय स्तरावर कृषी आयुक्त, पुणे, विभाग स्तरावर विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती, नागपूर आणि छत्रपती संभाजी नगर आणि जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अमरावती, नागपूर, वर्धा, छत्रपती संभाजी नगर हे सनियंत्रण करणार असल्याचे कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने कळविले आहे.

---

## शरद मोहोळच्या हत्येचे धागेदोरे साताऱ्यापर्यंत

### पिस्तूल पुरवणाऱ्या कराडच्या तरूणास अटक

**सातारा :** पुण्यातील गँगस्टर शरद मोहोळच्या हल्लेखोरांना पिस्तूल पुरवणाऱ्या कराडमधील तरुणाला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. धनंजय वाटकर, असं या तरुणाचं नाव असून तो कराड पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. दरम्यान, मार्च महिन्यात १४ पिस्तुलांसह दहा जणांना अटक करण्यात आली होती. त्यात धनंजय वाटकर याचाही समावेश होता.

**आतापर्यंत दहा जणांना अटक :** शरद मोहोळच्या हत्येप्रकरणी यापूर्वी पुणे पोलिसांनी आठ जणांना अटक केली होती. त्यानंतर आणखी दोन संशयितांना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या संशयितांची संख्या दहा झाली आहे. नुकत्याच अटक केलेल्या दोघांपैकी धनंजय वाटकर हा कराड पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे.

कराड पोलिसांनी जप्त केली होती १४ पिस्तुलं : कराड पोलिसांनी मार्च २०२३ मध्ये ओगलेवाडी येथे १४ पिस्तुलांसह दहा जणांना अटक केली होती. त्यात धनंजय वाटकर याचाही समावेश होता. मोहोळच्या हल्लेखोरांना पिस्तूल पुरविल्या प्रकरणी त्याला अटक करण्यात आली आहे. दरम्यान, शरद मोहोळ हत्येप्रकरणी तपास सुरू असताना पिस्तुल पुरवणारा कराडचा असल्याची माहिती हाती येताच पुणे पोलिसांनी त्याला अटक केली.

**सातारा जिल्ह्यात पिस्तूल विक्रीचे मोठे रॅकेट :** सातारा जिल्ह्यातील तरूणांचे मोठे रॅकेट पिस्तूल विक्रीमध्ये सक्रिय आहे. महिन्यात कुठे ना कुठे पिस्तूल जप्तीची कारवाई होते. मागील वर्षात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पिस्तुले जप्त करण्यात आली आहेत. गुरूवारी (११ जानेवारी) साताऱ्यातील मंगळवार तळे परिसरात योगेश देवकर या तरूणाकडून पिस्टल आणि काडतूस जप्त करण्यात आले आहे.

**दिवसाढवळ्या कुख्यात गँगस्टर शरद मोहोळवर गोळीबार :** पुण्यातील कोथरुडमधील सुतारदरा परिसरात ५ जानेवारीला दिवसाढवळ्या कुख्यात गँगस्टर शरद मोहोळ याच्यावर गोळीबार करण्यात आला होता. यावेळी मोहोळवर मारेकऱ्यांनी चार गोळ्या झाडल्या होत्या. मोहोळला गोळी लागल्यावर त्याला पुण्यातील वनाज इथं सह्याद्री हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

---

## श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा व छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आनंदाचा शिधा वाटप

**मुंबई :** अयोध्या येथील राम मंदिरामध्ये होणारा श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आनंदाचा शिधा वाटप सवलतीच्या दरात करण्यात येणार आहे. राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिका धारक शेतकरी अशा राज्यातील एकूण १,कोटी ६८ लाख ५० हजार ७३५ शिधापत्रिकाधारकांना दि. २२ जानेवारी २०२४ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आनंदाचा शिधा वाटप सवलतीच्या १०० रुपये दरात करण्यात येणार आहे.

आनंदाचा शिधा संचामध्ये १ किलो साखर, १ लिटर खाद्यतेल व प्रत्येकी अर्धा किलो चणाडाळ, रवा, मैदा व पोहा असे सहा शिधाजिन्नस आहेत. आनंदाचा शिधा प्रतिशिधापत्रिका १ शिधाजिन्नस संच ई-पॉस प्रणालीद्वारे १०० रुपये प्रतिसंच या सवलतीच्या दराने वितरीत करण्यात येणार आहे.

श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त व छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आवश्यक शिधाजिन्नस संचांची खरेदी करण्याकरिता एकूण ५४९.८६ कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील (एपीएल) केशरी शेतकरी शिधापत्रिकाधारकांना सन २०२२ च्या दिवाळी सणानिमित्त, सन २०२३ च्या गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इ. सणांनिमित्त तसेच सन २०२३ गौरी-गणपती उत्सवानिमित्त प्रत्येकी १ किलो रवा, चणाडाळ, साखर व १ लिटर खाद्यतेल असे शिधाजिन्नस समाविष्ट असलेला १ संच (आनंदाचा शिधा) १०० रुपये प्रतिसंच या सवलतीच्या दराने वितरीत करण्यात आला आहे. त्यानंतर सन २०२३ दिवाळी सणानिमित्त पात्र शिधापत्रिकाधारकांना १ किलो साखर, १ लिटर खाद्यतेल व प्रत्येकी अर्धा किलो चणाडाळ, रवा, मैदा व पोहा हे सहा शिधाजिन्नस समाविष्ट असलेला शिधाजिन्नस संच ' आनंदाचा शिधा'' वितरीत करण्यात आला आहे.

---

## राजकारणात धर्म आणू नये

### मात्र भाजपाचे राजकारण धर्माच्या आधारावर : नाना पटोले



**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांनी सुराज्य स्थापन केले तर संत महंतांनी अध्यात्माचे कार्य केले. शिवाजी महाराजांनी राजकारणात धर्म आणला नाही. छत्रपतींच्या सुराज्यात शेतकऱ्याच्या भाजीच्या देटालाही हात लावू नका अशी शिकवण होती पण आज भाजपाच्या राज्यात शेतकरी दररोज मरत आहे आणि सत्ताधाऱ्यांना त्याचे काहीच देणेघेणे नाही. अनेक पक्षांची सरकारे आली व गेली पण त्यांनी राजकारणासाठी धर्माचा वापर केला नाही परंतु भारतीय जनता पक्ष धर्माचा वापर आपल्या राजकारणासाठी करत आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

नाना पटोले पुढे म्हणाले की, अयोध्येत राम मंदिर व्हावे यासाठी आपणही यापूर्वी देगणी दिली, विटा दिल्या, राम मंदिरासाठी न्यास आहे पण भाजपा मात्र राम मंदिराचे राजकारण करत आहेत. अयोध्येतील राम मंदिराचे बांधकाम अर्धवट आहे ते पूर्ण होण्यास आणखी तीन वर्षे लागणार आहेत परंतु निवडणुकीच्या तोंडावर राजकीय फायदा उठवण्यासाठी अर्धवट बांधकाम असलेल्या मंदिरात प्राणप्रतिष्ठा करण्याची घाई भाजपाला झाली आहे. हिंदू धर्माचे सर्वोच्च असलेल्या चारही शंकराचार्यांचा अशा पद्धतीच्या प्राणप्रतिष्ठेला विरोध आहे. अर्धवट बांधकामाच्या मंदिरात प्राण प्रतिष्ठा करणे चुकीचे आहे असे शंकराचार्य सांगत आहेत पण भाजपा त्यांचेही ऐकत नाही. भारतीय जनता पक्ष धर्म भ्रष्ट करत आहे आणि आरोप मात्र काँग्रेस पक्षावर करत आहे.

# छ. शाहु महाराजांच्या जयघोषात दुमदुमली शाहुनगरी

## किल्ले अजिंक्यताऱ्यावर सातारा स्वाभिमान दिन अभूतपूर्व उत्साहात

**सातारा :** थंड हवेच्या गारठ्यात भल्या पहाटेच्या वातावरणात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोषात, तुताऱ्यांच्या निनादात, सनईचा मंजूळ स्वर, हलगीच्या वादनाने किल्ले अजिंक्यताऱ्यावरील राजसदरेवर वातावरण शिवमय झाले होते. छत्रपती शाहु महाराजांच्या राज्यभिषेक दिनानिमित्त शिवभक्त, शाहुभक्तांनी किल्याच्या प्रवेशद्वारापासून छत्रपती शाहु महाराजांची पालखी आमदार शिवेंद्रराजे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. जयघोषात फुलांच्या वर्षावात गडावरील देवतांचे दर्शन घेवून राजसदरेवर जय भवानी जय शिवाजीच्या जयघोषात आसमंत दणाणून सोडत विसावली. गडावर सातारा स्वाभिमान दिनाचा सोहळा पाहण्यासाठी साताऱ्यातील शिवभक्त, शिवप्रेमी, सातारकर यांनी आर्वजून हजेरी





लावली होती. या सोहळ्यामुळे शुक्रवारी सकाळी किल्ले अजिंक्यताऱ्यावर शिवमय असा महोल बनला होता.

किल्ले अजिंक्यताऱ्याच्या प्रवेशद्वार झेंडूच्या फुलांनी सजवण्यात आला होता. गडाच्या प्रवेशद्वारात भल्या पहाटे रांगोळ्या साकारण्यात आल्या होत्या. तुताऱ्यांचा निनाद गडाच्या प्रवेशद्वारावर घुमत होता. सनईचा मंजूळ स्वर वाजत होता. असे सगळे वातावरण छ. शाहु महाराजांच्या राज्यभिषेक दिनाच्या निमित्ताने होते. भल्या पहाटे कुडकुडत्या थंडीत छत्रपती शिवाजी महाराज कि जयचा जयघोष करत शिवभक्त व शाहु भक्तांनी भल्या पहाटे गड गाठला. गडाच्या प्रवेशद्वारापासून सगळ्या शिवभक्तांनी छत्रपती शाहु महाराजांच्या पालखीला आमदार शिवेंद्रराजे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. पालखी भराभर मावळ्यांनी गडाच्या पायऱ्या चढवत गडावर नेली. गडावरील देवतांचे दर्शन घेवून राजसदरेवर छत्रपती शिवाजी महाराज की जय छत्रपती शाहु महाराज की जय अशा घोषणा देत विसावली. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शाहु महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन कऊन राज्यभिषेक दिन साजरा करण्यात आला. यावेळी कन्हैय्यालाल राजपुरोहित, माजी उपनगराध्यक्ष अमोल मोहिते, नगरसेवक शेखर मोरे-पाटील, दत्ताजी भोसले, अमरदादा जाधव, डॉ. संदीप मंहिद गुरुजी, अजय जाधवराव, शिवानी कळसकर, रेणु येळगावकर, शिवराज्यभिषेक दिन उत्सव समितीचे दीपक प्रभावळकर, सुदामदादा गायकवाड, फिरोज पठाण, अमोल खोपडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

राजसदरेवर पालखी पोहचल्यानंतर सातारा स्वाभिमान दिनाच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला. सकाळच्या थंड गार वाऱ्यात दिलेल्या गगनभेदी घोषणांनी कार्यक्रमांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारला होता. भगवे फेटे, भगवे टिळे अन् भगव्या पोशाखातील कार्यकर्त्यांच्यामुळे सातारा स्वाभिमान दिनाचा कार्यक्रम हा छ. शाहुमय बनला गेला होता.

## संक्षिप्त

### प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत मोफत कौशल्य प्रशिक्षण घेण्याची संधी

**सातारा :** युवक-युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तरी जिल्ह्यातील युवक-युतींनी मोफत प्रशिक्षण लाभ घ्यावा.

ज्यांना मोफत प्रशिक्षण घ्यावयाचे आहे त्यांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला, सातारा किंवा ०२१६२२३९९३८ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुनिल पवार यांनी केले आहे.

### सारथीमार्फत मोफत प्रशिक्षणाची संधी लाभ घेण्याचे आवाहन

**सातारा :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) अंतर्गत जिल्ह्यातील लक्षित गटातील (मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी) उमेदवारांसाठी रोजगार, स्वयंरोजगारक्षम कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला, सातारा किंवा ०२१६२-२३९९३८ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुनिल पवार यांनी केले आहे.

### जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन १५ जानेवारी रोजी

**सातारा :** माहे जानेवारी २०२४ मध्ये जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सोमवार दि.१५ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथील नियोजन भवन येथे सकाळी ११ वा. आयोजित करण्यात आलेला आहे.

महिला लोकशाही दिनामध्ये अर्ज करण्यात महिलांनी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाकरिता करावयाचे विहित नमुन्यातील अर्ज संबधितांनी द्विप्रतीत करणे आवश्यक आहे. तक्रार अर्ज/ निवेदन हे वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. अर्जदार महिलांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर पाठविणे आवश्यक हे तदनंतर येणाऱ्या महिला लोकशाही दिनादिवशी मूळ अर्ज व अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांसह महिला लोकशाही दिनास उपस्थित राहणे आवश्यक आहे, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडून यांनी कळविले आहे.

### सवलतींची एस टी पकडताना प्रवाशांची धावाधाव

**कोरेगाव :** समाजातील सर्व घटकांना सामावून घेत राज्य शासनाने राज्य परिवहन महामंडळाच्या एस टी मधून प्रवास करताना सर्वाचा सन्मान केला मात्र कोणत्याही जिल्ह्यात एस टी ची संख्या वाढली नाही परिणामी वेगवेगळ्या सवलती मुळे प्रवासी वाढले उत्पन्न ही वाढले मात्र आता सवलतींची एस टी पकडताना प्रवाशांची धावाधाव पहायला मिळत आहे.

वाट पाहीन पण एस टी नेच जाईन एस टी च्या उद्घोषने प्रमाणे आजही ग्रामीण भागातील प्रवाशी एस टी प्रवासांसाठी दोन दोन तास थांबून रहात आहेत मात्र वेगवेगळ्या सवलती मुळे वाढलेल्या प्रवाश्यांना नेताना एस टी चालक वाहकाची कसरत होत आहे परिणामी रस्त्यावर उभे असणारे सर्व प्रवाशी बसवणं शक्य होत नसल्याने अनेकवेळा एस टी बस बस थांबा सोडून उतरणाऱ्या प्रवाष्यासाठी थोड्या अंतरावर उभी करावी लागत आहे अशी भावना एस टी चालकांची आहे मात्र वेळेत जाण्यासाठी दोन दोंन तास वाट पाहणारे प्रवाशी एस टी पकडणासाठी एस टी मागे धावत एस टी पकडत प्रवास करत आहेत त्यामुळे सवलत नको सन्मान नको पण बस साठी धावाधाव ही नको अशी भावना प्रवाशी व्यक्त करत आहेत.

राज्य शासनाने एस टी मधून सवलती देताना वाढणाऱ्या प्रवाष्याची व्यवस्था लक्षात घेऊन नियोजन करणे गरजेचं होत मात्र केवळ राजकीय हित डोळ्यासमोर ठेवून घोषित केलेल्या सन्मान योजना काय कामाच्या असा प्रश्न उस्थित होत आहे.

ग्रामीण भागातील हे वास्तव चित्र बदलण्यासाठी या भागात ज्यादा एस टी बस देऊन प्रवाशांचे होणारे हाल थांबवावेत अशी मागणी होत आहे.

# शहरातील सांडपाण्यामुळे पंचगंगा नदी प्रदूषित

## इचलकरंजी टाकवडे वेस येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी

**कुरुंदवाड :** तेरवाड, ता.शिरोळ येथे पंचगंगा नदीला प्रदूषित पाणी आले आहे.माशांना ऑक्सिजन मिळत नसल्याने मासे तडफडत आहेत. इचलकरंजी टाकवडे वेस येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली असता दोन प्रकल्प बंद असल्याचे निदर्शनास आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी पाण्याचे नमुने घेण्यासाठी आलेल्या प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विभागीय अधिकारी सचिन हरभट यांना प्रदूषित पाणी पाजून संताप व्यक्त केला.

प्रश्नाची सरबत्ती करत कारवाई केल्याशिवाय सोडणार नाही अशी भूमिका घेत अधिकारी हरबट यांना रोखले होते.

दरम्यान प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी जगन्नाथ साळुंखे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून प्रदूषण प्रश्नी वरिष्ठ कार्यालयाकडे अहवाल पाठवून कारवाई करू असे अश्वासन दिल्याने अधिकाऱ्यांना घेराव मुक्त केले.

इचलकरंजी,कोल्हापूर या मोठ्या शहरातील सांडपाणी प्रक्रिये विना पंचगंगा नदीचे मिसळत असल्याने पंचगंगा नदी प्रदूषित होत आहे. शेतकरी व शिरोळ तालुक्यातील ग्रामस्थ कॅन्सर ग्रस्त झाले आहेत. जनावरांनाही निरनिराळ्या आजाराची लागण होत आहे. इचलकरंजी आणि औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रियेविनाच थेट नदीत सोडले जात आहे.

प्रदूषित पाण्याने कॅन्सर सारखा आजार बळावून जीवित हानी होत असतानाही प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असून मृत्यूच्या परिक्रमेची वाट पाहत आहे का?असा सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विश्वास बालीघाटे,बंडू पाटीलसह शेतकऱ्यांनी पाण्याचे नमुने घेण्यासाठी आलेल्या अधिकारी हरबट यांना करत त्यांना इचलकरंजी जल शुद्धीकरण प्रक्रिया केंद्राची तपासणी करावी असे सांगत त्यांच्यासोबत तपासणीसाठी गेले असता जर शुद्धीकरणाचे दोन प्रकल्प बंद असल्याचे निदर्शनास आले.



**तेरवाड बंधारा येथे पंचगंगा नदीतील आलेले प्रदूषित पाणी पाण्याचे नमुने घेताना क्षेत्रीय अधिकारी हरभट.**

संतप्त शेतकऱ्यांनी संबंधित विभागाचे अधिकारी बाजीराव कांबळे यांना बोलवून घेत. त्यांच्यावरही प्रश्नांचा भडिमार करत

कोल्हापूर आणि इचलकरंजी या दोन महापालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा वीज पुरवठा बंद केल्याशिवाय आणि कारवाई केल्याशिवाय अधिकारी हरबट यांना सोडणार नाही अशी भूमिका घेत. संतप्त शेतकऱ्यांनी अधिकारी हर्बट यांना नदीतील प्रदूषित पाणी पाजत प्रश्नाची सरबत्ती करत संताप व्यक्त केला.

यावेळी बाबुराव कोइक,आप्पासाहेब चौगुले, सुहास कोळी, सागर पाटील,अभय आलासे,अरविंद सासणे,गोरख सासणे, सुनील सासणे, शंकर सासणे रवींद्र सासणे उमेश चिंचवाडे सह आदी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राम मंदिर लोकार्पणाचे निमंत्रण नाकारून काँग्रेसकडून हिंदूंच्या श्रद्धेची कुचेष्टा!

### धैर्यशील कदम यांचा आरोप

**सातारा, :** संपूर्ण भारतवासीयांचे श्रद्धास्थान आणि भारताच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असलेल्या प्रभू रामचंद्रांच्या भव्य मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याचे आणि प्रभू रामाच्या प्राणप्रतिष्ठा मुहूर्ताचे निमंत्रण नाकारून काँग्रेसच्या नेत्यांनी आपली हिंदुविरोधी मानसिकता उघड केली असून कोट्यवधी भारतीयांच्या भावनांचा अपमान केला आहे, अशा शब्दात भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांनी काँग्रेसवर हल्ला चढविला.

मुस्लिम अनुनयाचा वारसा घेऊन हिंदुद्वेषाच्या राजकारणापोटी राम जन्मभूमी मुक्ती आंदोलनाची थट्टा करणाऱ्या व निमंत्रण नाकारणाऱ्या काँग्रेसला येत्या निवडणुकीत जनता नाकारेल, असा इशाराही त्यांनी दिला.

काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे व खासदार अधीर रंजन चौधरी यांनी राम मंदिर उद्घाटन सोहळ्याचे निमंत्रण नाकारून हिंदुविरोधी राजकारणाचा आपला अजेंडा उघड केला आहे. न्यायालयासमोर प्रभू रामचंद्राचे अस्तित्वच नाकारून राम जन्मभूमी मुक्ती आंदोलनाच्या सहा शतकांच्या संघर्षास अपशकुन करू पाहणाऱ्या काँग्रेसकडून दुसरी अपेक्षा नव्हतीच, पण हिंदु समाजाच्या या प्रदीर्घ संघर्षाला मिळालेल्या यशामुळे पोटदुखी सुरू झालेल्या काँग्रेसने हिंदूंच्या आराध्य दैवताच्या मंदिराचे राजकारण करावे हे दुर्दैवी आहे, असे ते म्हणाले. हिंदूंच्या भावनांची कुचेष्टा करणाऱ्या काँग्रेस नेत्यांना श्रीरामाने सदबुद्धी द्यावी असा टोलाही त्यांनी मारला. राम मंदिराच्या उद्घाटनाचे निमंत्रण नाकारणाऱ्या काँग्रेसला आगामी निवडणुकीत नाकारून हिंदू जनता या अपमानाची परतफेड करेल, असा इशाराही धैर्यशील कदम यांनी दिला.

याच काँग्रेसने नवीन संसद भवनाच्या उद्घाटनावर बहिष्कार घातला. याच काँग्रेसने जी-२० परिषदेवर बहिष्कार घातला. कारगील विजय दिवसावरही बहिष्कार घातला. जेव्हा जेव्हा देशाची मान अभिमानाने उंचावली. तेव्हा तेव्हा काँग्रेसची पोटदुखी बळावली आहे, अशा शब्दात त्यांनी काँग्रेसवर टीकेची झोड उठविली.

समस्त भारतीयांचे श्रद्धास्थान असलेल्या राम जन्मभूमीवरील इस्लामी अतिक्रमण हटवून तेथे रामलल्लाची पुनर्स्थापना व्हावी यासाठी सहा शतके सुरू असलेल्या संघर्षास संघ-भाजपाचा कार्यक्रम म्हणून राजकीय स्वरूप देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असेल, तर या मुक्ती लढ्याचा हिंदु समाजाला अभिमानच वाटतो, असेही त्यांनी नमूद केले.

# पाल यात्रेनिमित्त मानकऱ्यांनी नियमांचे पालन करण्याचे आवाहन

**सातारा :** पाल ता. कराड या ठिकाणी २० ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत श्री खंडोबा देवाची वार्षिक यात्रा संपन्न होणार आहे. या अनुषंगाने पोलीस अधीक्षक समीर शेख यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ प्रमाणे पाल यात्रेतील मानकारी यांच्या घोड्यांच्याबाबतीत अटी व शर्थी संबंधाचे आदेश २२ जानेवारीच्या सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत जारी केले आहेत.

यात्रेच्या मुख्य दिवशीच्या मिरवणुकीमध्ये सामिल होणा-या मानाचा घोडा यास लगाम घातलेला असावा. तसेच मिरवणुकीमध्ये माणसाळलेला, शिकाऊ घोड्याचाच वापर करावा. इतर भाविकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. दि.२२ जानेवारी २०२४ रोजी मुख्य मिरवणुकीकरीता ८ वा. मानकरी बाबासाहेब इंजोजीराव पाटील रा. पाल ता. कराड यांचे वाड्यासमोर जमावे व आपल्या मानाप्रमाणे उभे रहावे. दुपारी २ वा. बैलगाडीतून देव देवळातुन मंडपातून मंडपाबाहेर आणल्यानंतर तेथून देवाची मिरवणुक मानकरी देवराज पाटील रा.पाल ता.कराड यांचे समवेत मिरवणूकीने निघावे. सदर वेळी मानाचा घोडा व चोपदार यांनी मिरवणुकीचे पुढे रहावे. सायंकाळी ६ वा.देवाचे लग्नाचा सोहळा संपन्न झाल्यानंतर मानकरी आपला घोडा आपले मुक्कामाच्या ठिकाणी घेवून जातील.

# रे नगर फेडरेशन लागले हस्तांतरण सोहळ्याच्या तयारीला

## महाराष्ट्र गृहनिर्माण मंत्रालयाचे अव्वर मुख्य सचिव वलसा नायर सिंग याची माहिती

**सोलापूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे श्रमिकांच्या स्वप्नातील घरांची चावी देण्यासाठी १९ जानेवारी रोजी सोलापूर ला येणार आहेत.१९ जानेवारी रोजी पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांचा सोलापूर दौरा निश्चित झालेला आहे.अशी असल्याची माहिती महाराष्ट्र गृहनिर्माण मंत्रालयाचे अव्वर मुख्य सचिव वलसा नायर सिंग यांनी भ्रमणध्वनी द्वारा रे नगर चे मुख्य प्रवर्तक तथा माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांना दिली आहे.त्या अनुषंगाने मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा श्रमिकांच्या वतीने भव्य आणि दिव्य स्वरूपात हर्षोल्लासात ,जल्लोषात स्वागत करणार येणार आहे. सोलापूर शहर व ग्रामीण भागातून किमान १ लाख श्रमिकांना याचे आग्रही निमंत्रण देणार आहे. समाजाच्या सर्व थरांतील,सर्व वर्गातील श्रमिक कष्टकरी बांधव जाहीर सभेसाठी येणार आहेत.ही अत्यंत



आनंदाची व अभिमानाची बाब आहे.हा स्वप्नपूर्ती सोहळा सोलापूरच्या इतिहासात भर टाकेल असे मत रे नगर चे मुख्य प्रवर्तक तथा माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांनी व्यक्त केले.

पंतप्रधान आवास योजना अंतर्गत शहरी भागातील ३० हजार असंघटीत कामगारांना एकाच ठिकाणी परवडणाऱ्या दरात सहकार तत्वावर रे नगर फेडरेशन, म्हाडा यांच्या पुढाकरातून जगातील एकमेव अभिनव अशा ३० हजार घरांचा महत्त्वाकांक्षी गृहनिर्माण प्रकल्प साकारत आहे. या गृहनिर्माण प्रकल्पाच्या पहिल्या टप्पातील १५ हजार घरांचा हस्तांतरण सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी भारत सरकार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.त्या अनुषंगाने जाहीर सभा होणार आहे. याच्या पूर्वतयारी करीता रे नगर कुंभारी येथे नियोजनासाठी मा.जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक ग्रामीण,म्हाडा संबधित सर्व अधिकारी, रे नगर मुख्य प्रवर्तक माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर,रे नगर चे चेअमन नलिनीताई कलबुर्गी, विकासक अंकुर पंधे,माजी नगरसेविका कामिनी आडम आदी समावेत शासकीय बैठका पार पडल्या आहेत.

### श्री खंडोबा देवाच्या यात्रेनिमित्त पाल परिसरातील वाहतुकीसंबंधीचे आदेश जारी

**सातारा :** पाल ता. कराड येथे श्री खंडोबा देवाची यात्रा दि.२० ते दि.२८ जानेवारी २०२४ या कालावधीत भरणार आहे. या निमित्ताने पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी २० ते २८ जानेवारी २०२४ कालावधीत पाल परिसरातील वातुकीत तात्पुरत्या बदलाचे आदेश जारी केले आहेत. काशिळकडून तारळेकडे जाणारी सर्व वाहने निसराळे फाटा- इमरसन कंपनी सासपडे मार्गे तारळेकडे जातील. तारळेकडून काशिळ अथवा कराडकडे जाणारी वाहतुक ही तारळे येथून कोंजावडे फाटा- सासपडे मार्ग खोडद फाटा वरुन कराड कडे जातील. कराड तसेच पाल भागातून तारळे भागात जाण्याकरिता खोडद, ता.जि. सातारा येथील फाटयावरुन इमरसन कंपनी शेजारुन सासपडे मार्गे तारळेकडे जातील.

# शिरोळ तालुक्यातील कृष्णा काठावर पुन्हा होणार बेसुमार माती उपसा..!

## ▪ तहसील कार्यालयात १५ अर्ज दाखल ; दोघांना मिळाला परवाना



**कुरुंदवाड : शिरोळ तालुक्यातील कृष्णा पोखरण्यासाठी हालचाली गतिमान होत असल्याचे दिसून येत आहे. सध्या तहसील कार्यालयात माती उपसा करण्यासाठी पंधरा अर्ज आले असून यापैकी दोन जणांना माती उपशासाठी परवाना देण्यात आला असल्याचे समजते. शिरोळ तालुक्यातील कृष्णाकाठावरील मळीची माती सुपीक असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वीटभट्टी कामासाठी वापरली जाते. त्यामुळे कृष्णाकाठावरील असलेल्या गावांना व मळीघाट नामशेष होत आहे. हीच परिस्थिती तालुक्यातील औरवाड, बुबनाळ, शेडशाळ आदीसह परिसरातील भागात आहे.**

**वीटभट्टी चालकांवर होणार संयुक्त कारवाई, फाईल शासन दरबारी**

**नदीपलीकडील कृष्णा काठ हा माती उपसा आणि वीटभट्टयांनी भरला आहे. शेडशाळ या गावामध्ये तर एक संपूर्ण गांव वसेल इतकी मोठी वीटभट्टी निर्माण करण्यात आली आहे. मात्र, स्थानिक प्रशासनाच्या डोळ्यावर पट्टी असल्याने कृष्णा नदीचा होणारा र्‍हास त्यांना दिसत नाही, त्यामुळे काही अधिकार्‍यांनी वीटभट्टी धारकांची फाईल तयार केली असून ती शासन दरबारी देण्यात आली आहे, त्यामुळे आता वीटभट्टी धारकांवर होणार्‍या कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.**

मिहसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे नियमबाह्य मातीचे उत्खनन करण्यासाठी माफिया तयार आहेत. नदीकाठी मातीचे उत्खनन रात्रंदिवस सुरू असते. नदीचे संवर्धन टिकविण्यासाठी उपाययोजना न करता राजरोसपणे औरवाड, बुबनाळ, शेडशाळसह परिसरात नियमबाह्य माती उत्खनन सुरू करण्यासाठी हालचाली गतीमान झाल्या आहेत.

**माती उपसा करणार्‍यांनी मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब केला का?**

**माती उत्खनन करीत असताना नदीपात्राच्या परिसरातील वनस्पती व प्राणी यांना धोका पोहोचणार नाही, याची काळजी घेण्याची गरज आहे. उत्खननाला ठेका दिलेल्या एकूण क्षेत्राच्या समप्रमाणात इतक्या क्षेत्रावर नदीकाठी अथवा अन्य ठिकाणी वृक्षलागवड करून त्यांची माहिती ग्रामपंचायतीला देण्याची आहे. तसेच वृक्षलागवड करताना प्रदूषण नियंत्रण मंडळाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करण्याचा आहे. सार्वजनिक पाणवठा, पाणीपुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा करताना निश्चित करेल तेवढ्या अंतरापलीकडे उत्खनन करायचे आहे. शासनाचा महसूल भरतो, मग माती उपसणारच, अशी भूमिका घेत हजारो ब्रास मातीचे उत्खनन परिसरात सुरू आहे. यातूनच वीटभट्टीमालकांना मोठा फायदा होताना दिसत आहे. दरम्यान, प्रशासनाने पाहणी करून मातीचे उत्खनन किती केले आहे यावर जुजबी कारवाई केल्याचे दिसून येते.**

कृष्णा नदीकाठावरील लाल माती उपसा करून सांगली जिल्ह्यातील अंकली, हरिपूर, इनामधामणी, बामणी, टाकळी, मिरज, या ठिकाणी साठवणूकही केली जाते, तर शिरोळ तालुक्यातील गावात अनेक जणांनी माती उत्खनन करून साठाही केला आहे. पर्यावरणाला हानी पोहोचवून होत असलेल्या नियमबाह्य माती उपशाला महसूल विभागाने वेळीच आवर घालणे गरजेचे होते. सध्याच्या स्थितीत अगदी नदीपात्रालगत माती उत्खनन केल्याने नदीच्या काठावरील संवर्धन धोक्यात आले आहे. एकीकडे राज्य शासन पर्यावरणाच्या दृष्टीने संवर्धनासाठी विविध योजना राबवीत आहे, तर दुसरीकडे अशा प्रकारच्या माती उत्खननामुळे कृष्णाकाठ काळाआड जाण्याची शक्यता आहे. औरवाड, बुबनाळ, शेडशाळ कवठेगुलंद आणि परिसरात माती उत्खनामुळे मळीच्या शेती नामशेष होत चालली आहे. त्यामुळे नदीचे पात्र मोठे झाले असून, अतिवृष्टी झाल्यास पावसाचे पाणी थेट गावात येणार आहे. आजच्या स्थितीला शेतकर्‍यांना कृष्णाकाठ शोधावा लागणार आहे. त्यामुळे महसूल विभागाने एक पाऊल पुढे येऊन माती उत्खननाची नियमावली देणे गरजेचे आहे

# नमो चषक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात युवकांनी सहभाग घ्यावा : डॉ अरविंद माने

## पूर्व ग्रामीणच्यावतीने विविध स्पर्धांचे आयोजन



**शिरोळ :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह सर्व वरिष्ठ नेते मंडळींच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात नमो चषक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे

भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने कोल्हापूर जिल्हा पूर्व ग्रामीणच्या अंतर्गत असणाऱ्या शिरोळ इचलकरंजी हातकणंगले शाहूवाडी पन्हाळा या विधानसभा मतदारसंघातून खेळाडू व युवकांनी नमो चषक क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावेत यासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून पन्नास हजार युवकांची नोंदणी केली जाणार असल्याची माहिती भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर पूर्व ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष आणि शिरोळचे माजी नगरसेवक डॉ अरविंद माने यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली आहे .भारतीय जनता पार्टी यांच्यावतीने नमो चषक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे हा नमो चषक प्रत्येक विधानसभा मतदारसंघात होणार आहे या माध्यमातून युवकांचे संघटन होण्याकरिता विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे क्रीडा प्रकारात कुस्ती कबड्डी खो-खो रस्सीखेच धावणे सायकल फुटबॉल व्हॉलीबॉल क्रिकेट बॅडमिंटन कॅरम बुद्धिबळ तर सांस्कृतिक प्रकारात चित्रकला गीत गायन नृत्य स्पर्धा एकांकिका सादरीकरण वक्तृत्व स्पर्धा संगीत खुर्ची स्पर्धा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे .या नमो चषक स्पर्धेसाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील पन्नास हजार युवकांची नोंदणी करण्यात येणार आहे स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसाठी भरघोस बक्षीस ठेवण्यात आले आहेत या स्पर्धेचे नेटके नियोजन शिरोळ इचलकरंजी हातकलंगले शाहूवाडी पन्हाळा या विधानसभा मतदारसंघात करण्यात आले आहे २२ जानेवारी २०२४ पासून नमो चषक स्पर्धेत सुरुवात होणार आहे

### प्रादेशिक परिवहन कार्यालयात आरोग्य शिबीराचे आयोजन

**सातारा :** प्रादेशिक परिवहन कार्यालयात १३ जानेवारी रोजी नेत्र व आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले असून याचा लाभ वाहनधारकांनी घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी केले आहे.

विशेष नेत्र व आरोग्य तपासणी मोहितम कार्यालयामार्फत रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने राबविण्यात येत आहे. याचा टॅक्सी चालक, ऑटोरिक्षा चालकांनी घ्यावा. त्याचबरोबर चालकांना चष्मे उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचेही श्री. चव्हाण यांनी कळविले आहे.

### सारथीमार्फत मोफत प्रशिक्षणाची संधी लाभ घेण्याचे आवाहन

सातारा : कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) अंतर्गत जिल्ह्यातील लक्षित गटातील (मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी) उमेदवारांसाठी रोजगार, स्वयंरोजगारक्षम कौशल्य व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नवीन प्रशासकीय इमारत, तळमजला, सातारा किंवा ०२१६२-२३९९३८ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व

# सातारा पालिकेच्या मुकादमास सफाई कर्मचाऱ्याकडून मारहाण

## आर्थिक कारणावरून फावडे डोक्यात घालून केले जखमी

**सातारा :** उसने पैसे दिले नाही म्हणून रागाच्या भरात सातारा पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्याने गुरुवार परज येथे मुकादमाच्या डोक्यात फावडे घालून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे या मारहाणीत संतोष खुडे, वय ४३ राहणार ढोणे कॉलनी रामाचा गोट हा मुकादम जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत.

सतीश मारुती जाधव राहणार आकाशवाणी झोपडपट्टी सातारा याच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला आहे. तक्रार अर्जातील अधिक माहितीनुसार गुरुवारी सकाळी साडेसात वाजता खुडे हे गुरुवार परज येथे कामावर हजर राहून सफाई कर्मचाऱ्यांची हजेरी घेत होते. त्यावेळी सतीश जाधव याने तेथे येऊन माझे उसने घेतले साडेसात हजार रुपये परत दे, नाहीतर तुला बघून घेईल असा दम दिला .तसेच रागाच्या भरात शिवीगाळ करत दुसऱ्या कर्मचाऱ्यांच्या हातातील फावडे घेऊन त्यांच्या डोक्यात जोरात प्रहार केला.या मारहाणीमध्ये खुडे गंभीर जखमी झाले दोघांच्या झटापटीमध्ये इतर सफाई कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करून भांडण सोडवले. जाधव रागाच्या भरात शिवीगाळ करत तेथून निघून गेला. खुडे यांना अधिक उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे उपचारानंतर त्यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यामध्ये जाधव याच्या विरोधात तक्रार अर्ज दिला आहे. सातारा पोलीस अधिक तपास करत आहे.

# हिट अँड रण कायदा रद्द करा

## खटाव तालुका चालक मालक वाहतूक संघटनेची मागणी

**वडूज :** सर्व ड्रायव्हर यांच्या विरुद्ध केलेला हिट अँड रण कायदा रद्द करा अशी मागणी खटाव तालुका चालक मालक वाहतूक संघटनेने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनातील अधिक माहिती अशी की,शासनाने आमलात आणलेला हिट अँड रण रद्द करावा जो शासनाने ७ लाख दंड व १० वर्षे कारावास शासनाने रद्द करावा जर चालकाकडे ७ लाख रुपये असते तर तो ड्रायवर झाला असता का?चालक हा देशाचा दळण-वळणाचा मुख्य कणा असताना त्याच्यावर एवढा मोठा अन्याय का असा अन्याय आम्ही सहन करणार नाही यासाठी आम्ही सर्व चालक-मालक सर्व वाहतूक बंद ठेवणार आहे.

जर हा कायदा रद्द झाला नाही तर येणाऱ्या पुढील काळात आम्ही सर्व चालक-मालक सर्व महाराष्ट्रभर वाहतूक बंद पुकारणार आहे जर सर्व सामन्यास जनतेस कोणताही त्रास झाल्यास होणाऱ्या परिणामास सर्व जबाबदारी प्रशासनाची असेल.

ट्रान्सपोर्ट युनियनने जो बंद पुकारला आहे त्याला खटाव तालुका चालक मालक संघटनेने एक दिवस बद ठेऊन पाठिंबा दर्शवला आहे.

हिट अँड रण कायदा रद्द करावा अन्यथा खटाव तालुक्यातील शासकीय,निमशासकीय,खाजगी वाहतूक बेमुदत बंद ठेवण्यात येईल त्यास प्रशासन जबाबदार राहील असा इशाराही त्यांनी दिला आहे.



यावेळी दिनकर खुडे, स्वप्नील ताटे, आबासाहेब भोसले, निखिल इंदापुरे, जयवंत खराडे, प्रशांत इंदापुरे, गणेश सकट, सोमनाथ फडतरे, अजित अवघडे, राजेश कुंभार, बाबासाहेब तुपे, अंकुश धावड, रवी गोडसे, किरण जाधव, आधिसह चालक मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उंब्रज मसूर ७ किलोमीटरला २५ रुपये वाटखर्ची

## आरटीओ हप्ते वसुलीत दंग ,एसटी महामार्गावरून सुसाट वाहतूक पोलीस आपल्याच नादात

**उंब्रज :** उंब्रज मसूर प्रवास करीत असताना खाजगी प्रवासी एकमार्गी वाहतुकीचा दर २५ रुपये घेतला जात असल्याने उंब्रज मसूर कराड एस टी बस सेवा सुरू करावी अशी मागणी होऊ लागली आहे.यामुळे कराड आर टी ओ हप्ते घेण्यासाठीच आहेत का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जाऊ लागला आहे.उंब्रज ते मसूर रस्ता डांबरीकरण पूर्ण झाल्याने चकचकीत दिसत आहे तसेच रेलवे फाटक बंद होऊन उड्डाण पुलाची निर्मिती झाल्याने विना अडथळा सुसाट वाहतूक सुरू आहे परंतु भिकेचे डोहाळे लागलेले एस टी महामंडळ टोल भरून महामार्गावरून सुसाट धावत आहे तर वाटसरू दुप्पट दाम खर्च करून खाजगी



प्रवाशी वाहनातून आपला प्रवास पूर्ण करीत आहेत यामुळे उंब्रज मसूर ७ किलोमीटरला २५ रुपये वाटखर्ची खर्ची घालावी लागत आहे तर कराड आरटीओ हप्ते वसुलीत दंग ,एसटी महामार्गावरून सुसाट आणि वाहतूक पोलीस आपल्याच नादात अशी केविलवाणी परिस्थिती उंब्रज परिसरातील नागरिकांच्यावर येऊन ठेपली आहे.

उंब्रज परिसरातील नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी कामानिमित्त ये जा करावी लागत असते तर विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामानिमित्त नियमित प्रवास करावा लागतो कराड शहराची वाढ सैदापुर ओगलेवाडी पर्यत विस्तारल्याने बस स्थानकावर उतरून अतिरिक्त पैसे खर्च करून आपला प्रवास करण्याची वेळ नागरिकांवर येत आहे.तर शाळा कॉलेजला जाणारे विद्यार्थी कराड बस स्थानक येथे उतरून पुन्हा इतर मार्गाने कॉलेजवर जात असतात यामुळे वेळ आणि पैसा या दोन्हींचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे.गोर गरीब विद्यार्थी व पालक यामुळे मेटाकुटीला आले आहे.

# सवलतींची एस टी पकडताना प्रवाशांची धावाधाव

**कोरेगाव :** समाजातील सर्व घटकांना सामावून घेत राज्य शासनाने राज्य परिवहन महामंडळाच्या एस टी मधून प्रवास करताना सर्वाचा सन्मान केला मात्र कोणत्याही जिल्ह्यात एस टी ची संख्या वाढली नाही परिणामी वेगवेगळ्या सवलती मुळे प्रवासी वाढले उत्पन्न ही वाढले मात्र आता सवलतींची एस टी पकडताना प्रवाशांची धावाधाव पहायला मिळत आहे.

वाट पाहीन पण एस टी नेच जाईन एस टी च्या उद्घोषने प्रमाणे आजही ग्रामीण भागातील प्रवाशी एस टी प्रवासांसाठी दोन दोन तास थांबून रहात आहेत मात्र वेगवेगळ्या सवलती मुळे वाढलेल्या प्रवाश्यांना नेताना एस टी चालक वाहकाची कसरत होत आहे परिणामी रस्त्यावर उभे असणारे सर्व प्रवाशी बसवणं शक्य होत नसल्याने अनेकवेळा एस टी बस बस थांबा सोडून उतरणाऱ्या प्रवाष्यासाठी थोड्या अंतरावर उभी करावी लागत आहे अशी भावना एस टी चालकांची आहे मात्र वेळेत जाण्यासाठी दोन दोंन तास वाट पाहणारे प्रवाशी एस टी पकडणासाठी एस टी मागे धावत एस टी पकडत प्रवास करत आहेत त्यामुळे सवलत नको सन्मान नको पण बस साठी धावाधाव ही नको अशी भावना प्रवाशी व्यक्त करत आहेत.

राज्य शासनाने एस टी मधून सवलती देताना वाढणाऱ्या प्रवाष्याची व्यवस्था लक्षात घेऊन नियोजन करणे गरजेचं होत मात्र केवळ राजकीय हित डोळ्यासमोर ठेवून घोषित केलेल्या सन्मान योजना काय कामाच्या असा प्रश्न उस्थित होत आहे.

ग्रामीण भागातील हे वास्तव चित्र बदलण्यासाठी या भागात ज्यादा एस टी बस देऊन प्रवाशांचे होणारे हाल थांबवावेत अशी मागणी होत आहे.

# आरोग्य विषयक मार्गदर्शन काळाची गरज : डॉ. मनिषा बाबर

**म्हसवड :** शालेय विद्यार्थिनीच्या भविष्यातील शारीरिक धोके टाळण्यासाठी किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉक्टर मनिषा विकास बाबर यांनी म्हसवड येथे केले.

कृषि विकास प्रतिष्ठान संचलित क्रांतीवीर इंग्लिश मीडियम स्कूल म्हसवड येथे किशोरवयीन मुलींचे आरोग्यविषयक शिबिर आयोजित केले होते. समुपदेशन शिबिरासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ. मनिषा बाबर तर कार्यक्रमाच्याअध्यक्ष म्हणून संस्थेच्या सचिव सुलोचना बाबर उपस्थित होत्या. यावेळी डॉ. मनिषा बाबर म्हणाल्या, जीवनातील किशोरवयीन अवस्था ही एखाद्या आनंदी फूल झाडाप्रमाणे असते. अत्यंत निरागस, स्वच्छंदी अशी ही अवस्था नाजूक व महत्वपूर्ण असते. शालेय स्तरावरील किशोरवयीन मुलींना भविष्यातील अनेक अडचणी व धोक्याची कल्पना योग्यवेळी सांगितली जात नाही त्यामुळे अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. किशोरवयीन मुलींच्या आरोग्याबाबत शालेय स्तरावर प्रबोधन व जनजागृतीची योग्य वेळी व योग्य व्यक्तीमार्फत होणे गरजेचे आहे. मुलींनी अभ्यासाबरोबरच आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. मुलींनी मासिक पाळीच्या वेळी योग्य व संतुलित आहार घेणे गरजेचे आहे. मुलींच्या वेगवेगळ्या शारिरीक समस्यांकडे वेळीच लक्ष दिले पाहिजे. यासाठी मुलींनी आपल्या समस्या आई किंवा शिक्षिका यांना सांगितल्या पाहिजेत अन्यथा अनेक संकटांना तोंड द्यावे



लागेल असा इशारा डॉ. बाबर यांनी दिला.

यावेळी डॉ.बाबर यांनी मुलींच्या आरोग्यावर चढउतार, अनावश्यक भिती, मासिक पाळी व यासंबंधी घ्यावयाची काळजी त्याबाबतचे उपचार, पौष्टिक आहार, जंक फूड खाण्याचे तोटे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महिला व किशोरवयीन मुलीसाठी शासनाच्या सुद्धा अनेक योजना आहेत त्याचा लाभ घेणे गरजेचे असल्याचे डॉक्टर बाबर यांनी तपशीलवार सांगितले .यावेळी क्रांतिवीर संकुलाच्या सचिव सुलोचना बाबर यांनी किशोरवयीन मुलींचे प्रश्न व योग्य वेळी घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले तसेच या शाळेत मुलींच्यासाठी विविध उपक्रम राबवली जात असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यींनींनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुवर्णा दराडे यांनी केले तर पाहुण्यांचे आभार वनश्री सावंत कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षिका व मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# राजमाता जिजाऊ स्वराज्य निर्मितीच्या प्रणेत्या : मनीषा आव्हाळे

## मराठा सेवा संघ झेडपी शाखेतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान



**सोलापूर :** राजमाता जिजाऊ या स्वराज्य निर्मितीच्या प्रणेत्या होत्या, त्यांच्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज घडले, त्यांचा आदर्श सर्व युवती महिलांनी घ्यावा, असे मत जिल्हा परिषदेच्या प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी मांडले.

जिल्हा परिषद मराठा सेवा संघ शाखेतर्फे राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये आयोजित कर्तृत्वमान महिलांच्या सन्मानप्रसंगी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशादीन शेळकंदे, अमोल जाधव, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले,जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले, समाज कल्याण अधिकारी सुनिल खमितकर, कार्यकारी अभियंता सुनील कलकर्णी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, पारसे, संतोष गाडेकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी नवनाथ नरळे,कृषि विकास अधिकारी परमेश्वर वाघमोडे, माध्यमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव आदी उपस्थित होते.

प्रारंभी जिल्हा परिषद मराठा सेवा संघ शाखेचे अध्यक्ष अविनाश गोडसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. जिल्हा परिषद मधील सर्व जिजाऊ व सावित्री लेकींचा मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यांत आला. त्यानंतर विविध क्षेत्रात सन्मान केलेल्या कर्तुत्वान महिलांचा सन्मान करण्यात आला. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन सिईओ मनिषा आव्हाळे यांचे हस्ते करणेत आले. या कार्यक्रमात उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( प्र) स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, माध्यमीक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ अनिता बांगर, कृषि अधिकारी दिपाली शेंडे, पत्रकार रेणूका वठारे, वरिष्ठ सहाय्यक प्रज्ञा कुलकर्णी, वरिष्ठ सहाय्यक ( लेखा) नम्रता मिठ्ठा, कनिष्ठ अभियंता मयुरी जावळकोटी, अंगणवाडी पर्यवेक्षीका वसुधंरा जिंदे, ग्रामसेविका सुरेखा सरवळे, प्राथमिक शिक्षिका ओमदेवी घंटे, परिचर छाया क्षीरसागर यांचा सिईओ मनिषा आव्हाळे यांचे हस्ते कर्तृत्ववान १३ महिलांचा गौरव करणेत आला. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, माध्यमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन सरस्वती पवार यांनी केले. व ख्यातमान गीतकार मोहम्मद अय्याज यांच्या राज्यगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

कार्यक्रमास कास्ट्राईब संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण क्षीरसागर, जिल्हा परिषद आरोग्य सेवा संघटना अध्यक्ष वाय पी कांबळे, शिक्षक सहकार संघटनेचे राज्य सरचिटणीस निलेश देशमुख, काशीनाथ बिराजदार, कर्मचारी युनियनचे अध्यक्ष तजमूल मुतवल्ली, राजेश देशपांडे, विवेक लिंगराज, दिव्यांग संघटनेचे लक्ष्मण वंजारी, ग्रामसेवक संघटनेचे शिवाजीराव गवळी, जुनी पेन्शन संघटनेचे अध्यक्ष रामचंद्र शिंदे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अनिरुद्ध पवार व विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चेतन भोसले विशाल भांगे, रोहीत घुले,वासुदेव घाडगे अभिजीत निचळ, आप्पासाहेब भोसले, सचिन पवार, सचिन साळुंखे, सचिन चव्हाण, राम जगदाळे, सुधाकर माने, देशमुख विशाल घोगरे, गणेश साळुंखे, विकास भांगे सूर्यकांत मोहिते, सुहास चेळेकर , आनंद साठे, विष्णू पाटील,अविनाश भोसले, हरिभाऊ देशमुख उमेश खंडागळे, अजय चव्हाण, ऋषिकेश जाधव,राहुल शिंदे जयंत पाटील , प्रभाकर माने, भूषण काळे, विकास खंडागळे, प्रकाश शेंडगे, गोपाळ शिंदे, लक्ष्मण अडसुळ, सर्जेराव गाडेकर, विठ्ठल मलपे, उमेश मोरे, आप्पासाहेब सरवळे, अशोक मोरे, अजीत देशमुख, सुभाष तणमोर, संजय डोके, रविंद्र शेंडगे,अश्विनी सातपुते, सविता मिसाळ, सुनिता भुसारे, ज्योत्सा साठे, शुभांगी गवळी, माधुरी भोसले, सुचिता जाधव, अनुपमा पडवळे, प्रतिक्षा गोडसे, भारती धुमाळ, सोनल केत,लक्ष्मी शिंदे . ज्योती लामकाने, माधुरी सुरवसे , यांनी परिश्रम घेतले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते मराठा सेवा संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

### जिजाऊंचा आठवावा प्रताप : सिईओ मनिषा आव्हाळे

**जिजांनी केवळ शिवबांना घडविले नाही तर चांगले सुशासन देणे साठी त्यांनी मेहनत घेतली. जिजाऊंचा आठवावे रूप व जिजाऊंचा आठवावा प्रताप असे म्हणावे लागेल. जिजाऊ चे कर्तृत्व महान आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी गड किल्ले बांधले, रस्ते बांधले, विकास केला त्याच बरोबर अष्टप्रधान मंडळ निर्माण केले. चांगले सुशासन निर्माण केले. असे सांगून जिजाऊ जयंती निमित्त चांगले उपक्रम राबविले बद्दल सेवा संघास सिईओ मनिषा आव्हाळे यांनी धन्यवाद दिले**

## ‘स्वराज्य कनिका जिजाऊ’ चित्रपटात ’ही’ अभिनेत्री साकारणार जिजाऊंची भूमिका!

राष्ट्रमाता, राजमाता जिजाबाई शहाजीराजे भोसले... यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी करून या मुलुखाला छत्रपती शिवाजी महाराज दिले. बुद्धिमत्ता, चातुर्य, पराक्रम, शौर्य, दूरदृष्टी, कुशल राजनिती, कुटुंबवत्सल असे सगळेच गुण त्यांच्यात होते. शिवबाचे शिवराय घडवताना त्यांनी अनेक वादळं पेलली पण या वादळात ही तेजस्वी ज्योत आणखी प्रखर झाली. प्रत्येक कसोटीवर खऱ्या उतरून जिजाऊंनी स्त्रीशक्ती व मातृशक्तिचे चिरंतन उदाहरण आपल्या सर्वांस दिले. जगाला दिशा देणाऱ्या या जगत्जननीच्या आयुष्यावर आधारित 'स्वराज्य कनिका जिजाऊ' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतीच या चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून या चित्रपटात जिजाऊंची भूमिका तेजस्विनी पंडित साकारणार आहे. या चित्रपटाचे पोस्टर झळकले असून राजमाता जिजाऊ यांची करारी मुद्रा यात दिसत आहे. ६ फायरफ्लाईज प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अनुजा देशपांडे या करत आहेत.

चित्रपटाबद्दल दिग्दर्शिका अनुजा देशपांडे म्हणतात, राजा नंतर घडतो, आधी घडते ती राजमाता'' राजमाता जिजाऊसाहेब या लोकजीवनाला जोडणारी अस्मिता तर आहेतच पण त्याचबरोबर मराठी माणसाला त्याच्या अस्तित्वाची-सामर्थ्याची जाणीव करून देणारी एक शक्ती आहेत . हा अभिमान व जाणीव उराशी बाळगून वीरकन्या ते वीरमातेच्या जीवनकाळचे कथानक २-२.३० तासात मांडणे एक लेखिका म्हणून माझ्यासाठी आव्हानात्मक होते . जिजाऊसाहेबांच्या आयुष्यावरील वेगळ्या धाटणीचा हा चित्रपट आहे. जिजाऊसाहेबांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व ,त्यांच्या आयुष्यातील न उलगडलेले प्रसंग-घटना आम्ही प्रेकक्षकांना दाखवणार आहोत.



एक युगपुरुष घडविणाऱ्या ह्या विलक्षण वात्सल्यमुर्तीला मानाचा मुजरा व साष्टांग प्रणिपात. जिजाऊसाहेबांचे व्यक्तिमत्व अभ्यासत लिहित असताना माझ्या डोक्यात सारखा विचार असायचा की, ’ही असामान्य भूमिका साकारण्यासाठी उत्तम व्यक्तिमत्व, उत्तम अभिनय असणारी अभिनेत्री मला हवी होती . तेजस्वीनी एक दर्जेदार अभिनेत्री तर आहेच शिवाय एक व्यक्ति म्हणून ती प्रेमळ आहे. त्याचसोबत एक उत्तम मार्गदर्शक व सहाय्यक आहे. तिच्या कामाप्रती ती खूप समर्पित व प्रामाणिक आहे. जिजाऊंचा करारीपणा तिच्यात झळकतो. मला पूर्ण खात्री आहे ती जिजाऊसाहेबांची भूमिका अगदी चोखपणे साकारेल.’

तेजस्विनी पंडित आपल्या भूमिकेबद्दल म्हणाली, ‘ज्या स्त्रीने गुलाम गिरीच्या काळोखात जखडलेल्या हिंद प्रांताला स्वतंत्र राज्य - स्वराज्य मिळावे हे स्वप्न पहिल्यांदा पाहिले, त्यासाठी वर्षानुवर्ष त्या झिजल्या, त्या भूमिकेवर अटल राहिल्या.

# किल्ले प्रतापगड संवर्धनाचा स्वतंत्र आराखडा तयार करा

## उपमुख्यमंत्री अजित पवारांची सूचना



**बैठकीत सूचना करताना ना. अजित पवार, शेजारी खा. उदयनराजे भोसले, जितेंद्र डुडी, ज्ञानेश्वर खिलारी व अधिकारी.**

### जिल्हाधिकाऱ्यांचे कौतुक

**साताराचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आजच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापुढे जिल्ह्यातील विविध विकास कामे व नियोजन आराखड्याचे योग्य पद्धतीने सादरीकरण केले. यामुळे डुडी यांचे ना. अजित पवार यांनी कौतूक केले. अशा पद्धतीने इतर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी आपले सादरीकरण करणे आवश्यक असल्याचे सांगून तुमच्या सारख्या जिल्हाधिकाऱ्याची पुण्यात गरज आहे. तुम्ही पुण्यात यावे अशी ऑफरही डुडी यांना पवार यांनी दिली.**

**सातारा :** सातारा जिल्ह्यातील किल्ले प्रतापगड संवर्धनासाठी स्वतंत्र आराखडा तयार करावा, त्यासाठी राज्यस्तरावरुन अधिकचा निधी दिला जाईल. तसेच जिल्ह्यात पर्यटकांची संख्या वाढत असल्याने इको टुरिझमला गती दिली जाईल, असा शब्द उपमुख्यमंत्री अजित पवर यांनी दिला.

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ च्या राज्यस्तरीय बैठकीत आज पुणे विभागाच्या सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यातील जिल्हा वार्षिक योजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, आ. मकरंद पाटील, दीपक चव्हाण, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, नियोजन समितीचे शशिकांत माळी आदी उपस्थित होते.

ना. अजित पवार म्हणाले, जिल्हा वार्षिक योजनेमध्ये देण्यात येणारा निधी प्राधान्याने सामाजिक क्षेत्रातील विविध योजनांवर विशेषत: शिक्षण, आरोग्य, पर्यटन, महिला व बाल विकास, कृषी, मृद व जलसंधारण क्षेत्रासाठी उपयोगात आणावा. आ. मकरंद पाटील यांनी वाई मतदारसंघासह सातारा जिल्ह्याला सर्वाधिक निधी देण्यात यावा, तसेच पर्यटन व प्रतापगडच्या विकासासाठी निधी मिळण्याची मागणी केली. त्यावर अजित पवार यांनी सातारा जिल्ह्याने प्रतापगड किल्ला संवर्धनासाठी स्वतंत्र आराखडा तयार करावा. त्यासाठी राज्यस्तरावरून निधी देण्यात येईल. जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून इतर कामे करता येतील, असे त्यांनी सांगितले. तसेच इको टुरिझममुळे पर्यटकांची संख्या वाढत असल्याने त्यासाठी देखील आवश्यक निधी देण्यात येईल, असे सांगितले.

केंद्राच्या महत्वाकांक्षी योजनांमध्ये प्रधानमंत्री स्कूल रायझिंग इंडिया, अमृत योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, जल जीवन मिशन, हर घर जल, ट्रॅव्हल फॉर लाईफ, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आदींचा समावेश आहे. या केंद्राच्या योजनांची अभिसरणाद्वारे प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश ना. पवार यांनी दिले.

# अहिंसा पुरस्काराने म्हमाणे सन्मानित

**म्हसवड :** सहकार क्षेत्रात अव्वलस्थानी असलेल्या येथील अहिंसा नागरी पतसंस्थेने सामाजिक क्षेत्रातही आपले मोठे योगदान दिले आहे, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कार्य करणार्या व्यक्तींचा या पतसंस्थेने नेहमीच पुरस्कार देवुन गौरव केला असुन यंदाही हिंदी दिनानिमीत्त म्हसवड येथील सिध्दनाथ विद्यालयातील आदर्श शिक्षक अशी प्रतिमा असलेल्या शशीकांत म्हमाणे यांना अहिंसा पुरस्कार देवुन गौरवण्यात आले.

१० जानेवारी हा दिवस विश्व हिंदी दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. त्या दिवशीच हिंदी विभागात विशेष योगदान असणारे शिक्षक शशिकांत म्हमाने यांना सातारा जिल्हा शिक्षक बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव बनसोडे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करून विश्व हिंदी दिनआगळा वेगळा स्वरूपात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख मान्यवर जिल्हा बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव बनसोडे,पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत म्हमाने, संस्थेचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष नितिन दोशी, सिद्धनाथ हायस्कूलचे व जुनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रविण दासरे, विठ्ठल सजगाने, संतोष देशमुख उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

म्हमाने यांना शाल, सन्मानचिन्ह, रोख रक्कम व भेटवस्तू देऊन जिल्हा शिक्षक बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव बनसोडे यांचे हस्ते अहिंसा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी संतोष देशमुख म्हणाले म्हमाने म्हमाणे हे उपक्रमशील शिक्षक असून हिंदी विषयात त्यांनी विविध विद्यार्थ्यांना नेहमी प्रेरणा दिली आहे. आर्थिक दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा मदतीचा हात असतो.विठ्ठल सजगाने आपल्या मनोगतात म्हणाले की समाजातील चांगल्या कामाचा अहिंसा पतसंस्थेकडून नेहमीच गौरव करण्यात येतो. म्हमाने यांचे हिंदी विषयातील योगदान व विद्यार्थ्यां प्रती असणारी धडपड पाहून अहिंसा पुरस्काराने ते आज सन्मानित झाले आहेत.

आजच्या पुरस्काराने शैक्षणिक कार्यात जोमाने काम करण्यास निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.शिक्षक हा भावी पिढी घडवत असतो. त्यामुळे शिक्षकांनी फार जबाबदारीने वागले पाहिजे आपण कसे वागतो हे समाज व विद्यार्थी पाहत असतात. त्यामुळे शिक्षकांवर खूप मोठी जबाबदारी आहे.

सिद्धनाथ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य दासरे म्हणाले शशिकांत म्हमाने यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन अहिंसा पतसंस्थेने आमच्या सिद्धनाथ हायस्कूलचा सन्मान केला आहे. म्हमाने सर हे विद्यार्थी प्रिय शिक्षक असून त्यांचे नेहमी नाविन्य पूर्व उपक्रम सुरू असतात. हिंदी विषयाच्या अध्यापकाचा हिंदी दिना दिवशी अहिंसा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळत आहे हा अतिशय चांगला योगायोग आहे.

अहिंसा पतसंस्थेचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष नितिन दोशी म्हणाले की अहिंसा पतसंस्थेच्या संचालक मंडळांनी म्हमाने सरांचे शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य पाहून त्यांनाअहिंसा आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला. म्हमाने हे विद्यार्थी व आपली शाळा यास केंद्रबिंदू मानून काम करणारे शिक्षक आहे. जिल्हा हिंदी अध्यापक मंडळावर ते कार्यरत आहेत .सिद्धनाथ हायस्कूलमध्ये हिंदी राष्ट्रभाषा परीक्षेस दरवर्षी उच्चांकी विद्यार्थी बसवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. विश्व हिंदी दिनानिमित्त एका हिंदी विषय शिकवणाऱ्या शिक्षकास हा पुरस्कार देताना खूप आनंद होत आहे.

# भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्या : जीवन गलांडे

## पाल येथे अंतिम आढावा बैठक संपन्न,प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात

**उंब्रज :** महाराष्ट्र कर्नाटक,आंध्रप्रदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पाल ता.कराड येथील खंडोबा देवाच्या यात्रेचे नियोजन योग्य रित्या करून भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्या.तसेच दि. २० पासून दि.२६ जानेवारी पर्यंत सर्वांनी आपली जबाबदारी पार पाडावी अशा सक्त सूचना सर्व शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांना करून यात्रेत उधळण होणा-या भंडा-याची तपासणी करण्याच्या सूचना ही अन्न व औषध प्रशासनाला केली. तसेच यात्रेच्या अगोदर करण्यात येणारी सर्व कामे पूर्ण करावीत असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांनी दिले.

पाल ता. कराड येथील खंडोबा-म्हाळसा देवाच्या यात्रेचा दि.२२ जानेवारी हा मुख्य दिवस आहे. त्या अनुषंगाने देवस्थान ट्रस्ट, ग्रामपंचायत प्रशासन तसेच सर्व शासकीय विभाग व ग्रामस्थ यांच्यात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, तहसीलदार (परिक्षाधिन जिल्हाधिकारी)दोन्तुला जेनित चन्द्रा, कराड पोलिस उपविभागीय अधिकारी गणेश ठाकूर,गटविकास अधिकारी विजय विभुते,सपोनि प्रशांत बधे,कराड उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसन्ना पवार,देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष देवराज पाटील, सातारा जिल्हा भाजपा उपाध्यक्ष सुरेश पाटील,ट्रस्टी संजय काळभोर,यात्रा कमिटी चेअरमन प्रशांत दळवी, सरपंच सुनिता घाडगे, उपसरपंच गणेश खंडाईत, ग्रामपंचायत सदस्य यासह शासकीय विभागाचे अधिकारी,कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



### विक्रमी वेळेत पुलाची निर्मिती , अवैध धंदे बंद करा

**तारळी नदीपात्रात मिरवणूक मार्गावरील सुमारे तीन कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणारा पूल बांधकाम खात्याने अतिशय कमी कालावधीत दिवसरात्र काम सुरू ठेऊन यात्रा कालावधी सुरू होण्यापूर्वी पूर्ण करण्याचा ध्यास घेतला आहे.याचे कौतुक आढावा बैठकीत करण्यात आले तर एका ग्रामस्थांने अवैध धंदे सुरू असल्याची माहिती अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांना प्रशासन व ग्रामस्थांच्या बैठकीत दिल्याने आजच्या आज अवैध धंदे बंद करण्याची तंबी संबंधित अधिकाऱ्यांना दिली.**

अप्पर जिल्हाधिकारी गलांडे यांनी सर्व शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांकडून आत्तापर्यंत केलेली तयारी तसेच राहिलेली कामे जाणून घेत प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. यावेळी मंदिरासह परिसरात उभारण्यात येत असलेल्या दर्शन बारीची पाहणी करून पार्किंग व्यवस्था, पालखी मार्ग पूलाच्या कामाची पाहणी केली.यावेळी बोलताना ते म्हणाले,यात्रा समन्वयातून व निर्विघ्नपणे पार पाडायची आहे. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी नियोजनाच्या अनुषंगाने समस्या उपस्थित केलेल्या समस्यांचा अपवाद वगळता निपटारा झाला असल्याचे ग्रामस्थ तसेच पाल देवस्थान यांनी सांगून सर्व विभागाचे अभिनंदन केले.

देवराज पाटील म्हणाले, पालखी मार्ग पूलाचे काम युद्ध पातळीवर चांगल्या पद्धतीने सुरू असल्याचे सांगून पूलाच्या कामासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी व कॉन्ट्रॅक्टर यांचे अभिनंदन करून विविध विभाग यात्रा अनुषंगाने करत असलेल्या तयारीच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. त्याचबरोबर देवस्थानच्या जागेत भक्त निवास तसेच आरसीसी दुकान गाळे बांधण्यासाठी प्रयत्न करणार असून यासाठी लागणारा निधी शासनाकडून मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

करायचे काम आणि केलेले काम याचा आढावा प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांनी घेऊन प्रगती पथावरील कामे जाणून घेतली. तर कामे का झाली नाहीत याचे सबळ कारण जाणून घेत संबंधिताना सूचना केल्या.पाच पथक स्थापन करतोय असे सांगत ज्या विभागाचे आदेश होतील त्याचे पालन करावे. वॉकीटॉकीचा वापर समन्वय साधण्यासाठी करून सर्व विभागांनी समन्वयाने काम केल्यास येणाऱ्या भाविकांना चांगले दर्शन होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी महावितरण, कराड उपप्रादेशिक परिवहन, परिवहन महामंडळ, पशुसंवर्धन,अन्न व औषध प्रशासन, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे, ग्रामीण पाणीपुरवठा, राज्य उत्पादन शुल्क,बीएसएनएल, पोलिस विभाग यांनी केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. आभार सुरेश पाटील यांनी मानले.